# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२३ / अग्रहायण २३, १९४५ ( शके )**

**(१) सहकार मंत्री**
**(२) महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री**
**(३) वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री**
**(४) आदिवासी विकास मंत्री** } **यांचे प्रभारी विभाग**
**(५) कृषी मंत्री**
**(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री**
**(७) मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३१**

---

### लातूर जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या "मागेल त्याला शेततळे" योजनेची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(१) * ७७०४२ श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोरडवाहू शेतीसाठी, पाणलोट व जलसंवर्धनातून सिंचनाची उपलब्धता निर्माण करण्यासाठी तसेच दुष्काळ व पाणीटंचाईवर मात करण्यासाठी "मागेल त्याला शेततळे" ही महत्वाकांक्षी योजना शासनाने राबविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर शेततळयांपैकी जवळपास ६९३ शेततळयांची कामे अद्याप सुरु झाली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती असून पावसाचा पडलेला खंड व निर्माण झालेल्या पाणीटंचाईमुळे पर्जन्यधारित कोरडवाहू शेती व शेतकरी अडचणीत आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने तातडीने चौकशी करुन उक्त योजनेंतर्गत प्रलंबित शेततळयांची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही. हे खरे नाही.

लातूर जिल्ह्यात ‘‘छत्रपती शिवाजी महाराज कृषि योजना’’ (मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना (मागेल त्याला शेततळे) या योजनेंतर्गत दिनांक २८/११/२०२३ अखेर पूर्व संमती दिलेल्या २१० शेततळयांपैकी ४७ शेततळयाची कामे पूर्ण झाली असून उर्वरित १६३ शेततळयांची कामे सुरू ठेवण्याबाबत संबंधित लाभार्थी शेतकऱ्यांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच ग्रामपंचायत/पंचायत समिती मार्फत २८५ शेततळयाच्या कामांना मान्यता देण्यात आली असून सन २०२३-२४ मध्ये २८ कामे पूर्ण झाली आहेत व ९८ कामे प्रगतीपथावर / अपूर्ण आहेत आणि १५९ कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देवून मजूरांची मागणी येताच सुरू करण्यासाठी तयार (शेल्फवर) ठेवण्यात आली आहेत.

(३) व (४) लातुर जिल्ह्यात वार्षिक पर्जन सरासरीच्या ६८ टक्के पर्जन्यमान झालेले आहे. दुष्काळसदृश्य परिस्थितीस अनुसरुन विहित सवलती लागू करण्यात आलेल्या आहेत. तसेच महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरांच्या काम मागणीनुसार ग्रामपंचायत स्तरावर पंचायत समितीमार्फत कामे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज कृषि योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पूर्वसंमती मिळालेल्या उर्वरित पात्र लाभार्थी शेतकऱ्यांनी शेततळ्याचे काम लवकर पूर्ण करुन काम पूर्णत्वाचा दाखला व अनुदान मागणी अर्ज महाडीबीटी पोर्टलवर अपलोड करण्याबाबत क्षेत्रीय स्तरावरील यंत्रणेमार्फत सतत पाठपुरावा सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एस.टी.कामगारांच्या महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट सहकारी बँकेमध्ये सुरु असलेल्या अनागोंदी कारभाराबाबत

**(२) * ७२१२८ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एस.टी.कामगारांच्या महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट सहकारी बँकेमधील अनागोंदी प्रशासकीय गैरकारभाराविरोधात बँक कर्मचाऱ्यांनी माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान संप करुन आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस.टी. बँकेच्या संचालक मंडळाने घेतलेल्या मनमानी व चुकीच्या निर्णयामुळे सभासदांनी १८० कोटी रुपयांच्या ठेवी काढून घेतल्या असून त्यामुळे बँकेचा क्रेडिट डिपॉझिट रेशो ८५ टक्क्यांपेक्षा जास्त झाल्याने बँक आर्थिक अडचणीत सापडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेकायदेशीरपणे ठेवी काढणे व नियमबाह्य नियुक्त्या करणे इत्यादी समस्यांबाबत मा.सहकार मंत्री व मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे कामगार संघटनांनी तक्रार केली असून सदर बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्याची मागणी देखील सहकार आयुक्त यांचेकडे दिनांक ४ सप्टेंबर, २०२३ व दिनांक २ आक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) एस.टी.कामगारांच्या महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट सहकारी बँकेमधील बँक कर्मचाऱ्यांचा दिनांक ०५.०९.२०२३ रोजीचा संप कोणतीही पूर्वसुचना व मागणीशिवाय सुरू करण्यात आला होता. सदर संप दिनांक ०६.१०.२०२३ रोजी मागे घेवून बँक कर्मचारी कामावर रुजु झाले आहेत.

(२), (३) व (४) बँकेच्या ठेवीदारांनी सुमारे रु.१८० कोटीच्या ठेवी काढल्यामुळे बँकेचा क्रेडीट डिपॉझिट रेशो CD रेशो वाढला होता. सदर सी डी रेशो कमी करण्यासाठी बँकेने कर्ज वितरण मर्यादित प्रमाणात सुरु ठेवले आहे

व ठेवी वाढविण्यासाठी विशेष ठेव योजना कार्यान्वित केली आहे. बँकेच्या संचालक मंडळाने दिनांक १०.७.२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र.७ "पगारदार असल्याने कर्मचारी जामीनदाराची गरज नाही" व ठराव क्र. ९ "कर्जाचे व्याजदर ९% व १४% वरून ७% इतके कमी" करण्याचा ठराव केला आहे.

मात्र सदर ठरावामुळे बँकेचे आर्थिक नुकसान होणार असल्याने भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक ०५.०९.२०२३ च्या पत्रान्वये योग्य ती कार्यवाही करण्याचे बँकेस निर्देश दिले आहेत. त्यानुसार बँकेने सदर ठराव मागे घेतल्याचे दिनांक १५.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये भारतीय रिझर्व्ह बँकेस कळविले आहे.

संचालक मंडळाच्या मनमानी कारभारामुळे बँकेचे नुकसान होत असल्याने बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्याबाबत सभासदांचा तक्रार अर्ज सहकार आयुक्त कार्यालयास अथवा शासनास अद्याप प्राप्त नाही.

संचालक मंडळाच्या चुकीच्या निर्णयामुळे बँकेच्या व्यवसायावर अनिष्ट परिणाम होत असल्याने बँकेचे कामकाज सहकार कायदा व बँकीग नियमन अधिनियम मधील तरतूदीनुसार होत आहे किंवा नाही याबाबतचा आढावा घेण्याचे निर्देश सहकार आयुक्तांनी दिनांक २५.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांना दिले आहेत. त्यानुसार विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांचे स्तरावरून आवश्यक ती कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शेतकरी "नमो शेतकरी महासन्मान" निधी योजनेपासून वंचित असल्याबाबत**

**(३) * ७१७७२ श्री.मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने "नमो शेतकरी महासन्मान" योजनेंतर्गत वर्षाला सहा हजार रुपये अदा करण्याबाबतची घोषणा करुनही त्याची अंमलबजावणी राज्यात प्रभावीपणे झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत अपूर्ण माहिती भरणे, ई-केवायसी, आधार लिंक नसणे, त्रुटींची पूर्तता वेळेत न करणे, कागदपत्रांची पूर्तता करुनही अनुदान न मिळणे, पिक कर्ज न भरल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे बँक खाते सिल झाल्यामुळे अनुदानाची रक्कम बँकेतून काढता न येणे व काही ठिकाणी शेती महानगरपालिका हद्दीत येणे इत्यादी अनेक तांत्रिक कारणांमुळे शेतकरी या अनुदानापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ई-केवायसी व आधार लिंककरिता दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ ही अंतिम मुदत देण्यात आली असून त्यानंतर पूर्तता न केलेल्या शेतकऱ्यांचे सदर योजनेद्वारे मिळणारे पेन्शन कायमचे बंद करण्याचा इशारा केंद्र शासनाने दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शेतकऱ्यांनी विविध स्तरावर अनेक तक्रारी करुनही शासनस्तरावर याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन या योजनेचा लाभ पात्र शेतकऱ्यांना तातडीने मिळणे तसेच कागदपत्र पूर्ततेची मुदत वाढवून देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.

नमो शेतकरी महासन्मान निधी योजना दिनांक १५.०६.२०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्यात राबविण्यात येत असून सदर योजनेचा पहिला हप्ता पी. एम. किसान योजनेतील १४ व्या हप्त्याचा लाभ प्राप्त झालेल्या लाभार्थींना दिनांक २६ ऑक्टोबर, २०२३ रोजी वितरीत करण्यात आला आहे.
(२) होय हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाकडून प्राप्त १४ व्या हप्त्यातील लाभार्थी यादीतील एकूण ९६,८११ लाभार्थींची बँक खाती आधार संलग्न नसल्याने या लाभार्थींना दिनांक २६.१०.२०२३ रोजी सदर योजनेचा लाभ अदा होऊ शकला नाही. सदर पात्र लाभार्थ्यांना लाभ अदा करण्यासाठीची कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) हे खरे नाही.

पी. एम. किसान योजनेच्या लाभासाठी ई-केवायसी व बँक खाते आधार संलग्न करणे या बंधनकारक केलेल्या बाबीची पूर्तता केलेल्या लाभार्थींचा योजनेचा देय लाभ बंद न होता केंद्र शासनस्तरावर पूर्ववत केला जातो.
(४) हे खरे नाही.
(५) राज्यात दिनांक ०१ मे, २०२३ पासून विशेषत: ई-केवायसी व बँक खाते आधार संलग्न न केलेल्या लाभार्थींसाठी गावपातळीवर मोहीमस्वरुपात कार्यवाही करण्यात येत आहे.

योजनेच्या लाभासाठी ई-केवायसी व बँक खाती आधार संलग्न करणे या बंधनकारक बाबींची पूर्तता लाभार्थींनी स्वत: करावयाची असून त्यासाठी लाभार्थी स्वत: प्रत्यक्षपणे उपस्थित असणे आवश्यक आहे. या बाबीची पूर्तता केलेल्या लाभार्थींचा योजनेचा देय लाभ बंद न होता केंद्र शासनाकडून पूर्ववत केला जातो.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वेलटवाडी (ता.अलिबाग, जि.रायगड) या आदिवासी वाडीत निसर्ग चक्रीवादळामुळे विस्थापित झालेल्या आदिवासी कुटुंबांचे अद्यापही पुनर्वसन झाले नसल्याबाबत

**(४) * ७१९०९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वेलटवाडी (ता.अलिबाग, जि.रायगड) या आदिवासी वाडीत निसर्ग चक्रीवादळामुळे विस्थापित २३ आदिवासी कुटुंब अद्यापही मोकळ्या जागेत झोपड्या बांधून रहात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निसर्ग चक्रीवादळामुळे विस्थापित झालेल्या आदिवासी कुटुंबाचे वनखात्याच्या जाचक धोरणामुळे अद्यापही पुनर्वसन न झाल्यामुळे त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन विस्थापित आदिवासी कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

मौजे वेलटवाडी (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील राखीव वन क. नं. १७२ मध्ये काही आदिवासी (ठाकूर) कुटूंब रहात होते. ते पुर्वीपासून तेथे शेती करत होते. सन २००९-१० मध्ये त्यापैकी काही आदिवासींना शेतीसाठी वनहक्क दावे मंजूर झाले आहेत. तद्नंतर वस्तीमधील २३ आदिवासी (ठाकूर) कुटुंब सन २०११-१२ दरम्यान डोंगरपायथ्याशी राखीव वनात पक्की घरे बांधून राहात आहेत. माहे जून, २०२० मध्ये झालेल्या निसर्ग चक्रीवादळात या २३ कुटुंबाचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

उक्त २३ कुटुंबांव्यतिरिक्त उर्वरित २३ आदिवासी (ठाकूर) कुटूंब चक्रीवादळानंतर डोंगर पायाथ्याशी आले. त्यावेळी जिल्हाप्रशासन व ग्रामपंचायत खानाव यांनी त्यांना तात्पुरता निवारा म्हणून मौजे भेरसे येथील संरक्षीत वन गट क्र. ३९३ मध्ये पत्र्याची शेडमध्ये राहण्यासाठी व्यवस्था करुन दिली तर काही आदिवासी कौलारु झोपडया बांधून राहात आहेत.

सदर बाधीत २३ कुटूंबाना शासनाकडून प्रत्येकी रक्कम रु. १.६० लक्ष नुकसान भरपाई देण्यात आली. तद्नंतर संबंधित कुटूंबियांनी मौजे भेरसे येथील गट क्र. ३३३ (क्षेत्र ०.३१.१० हे.आर) ही खाजगी मिळकत खरेदी केली आहे. सद्य:स्थितीत सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी उक्त २३ कुटुंबधारकांची नावे दाखल झाली आहेत.

-----------------

## राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वस्तुंची खरेदी विभागातर्फे करुनही पुरवठा करण्यात न आल्याबाबत

**(५) * ७४५८१ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागाने राज्यातील विद्यार्थ्यांसाठी थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) योजना बंद करुन गणवेश, नाइट ड्रेस व शालेय साहित्य आदी सहा वस्तूंची खरेदी विभागातर्फे करुन त्याचा पुरवठा करण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयानंतर तीन महिने उलटूनही अद्याप १५० कोटी रुपयांच्या खर्चाला मान्यताच दिलेली नसून निविदा राबवून त्या वस्तूंचा विद्यार्थ्यांना पुरवठा होईपर्यंत शैक्षणिक वर्ष संपण्याची शक्यता असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अर्धे शैक्षणिक वर्ष उलटले तरीही विद्यार्थ्यांना साहित्य दिलेले नसून शासनाने त्यात लक्ष घालून आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांचा हक्क द्यावा, अशी मागणी सर्व माध्यमातून करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना आवश्यक वस्तू पुरवठा करण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावित :** (१), (२), (३) व (४) दिनांक ३१.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये गणवेश, पी. टी. ड्रेस, पी.टी.शुज व सॉक्स, नाईट ड्रेस, शालेय साहित्य व लेखन सामग्री या वस्तू थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रकियेतून वगळण्यात येऊन सदर वस्तूंची खरेदी, निविदा प्रक्रिया राबवून आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना पुरविण्याचा निर्णय घेतला होता.

तथापि, निविदा प्रक्रियेस विलंब होत असल्याने सदरील वस्तुंऐवजी थेट अनुदान विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनेक जिल्ह्यात कमी पाऊस झाल्यामुळे दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याबाबत

**(६) * ७१७०४ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.मानसिंग नाईक (शिराळा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी कमी पाऊसामुळे दुष्काळसदृश्य स्थिती निर्माण झाली असून बहुतांश तालुके अवर्षणग्रस्त झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात कमी पर्जन्यमान झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात पिण्याच्या पाण्याची तसेच चाऱ्याची टंचाई निर्माण होऊन पीक उत्पादनात घट झाल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात दुष्काळ जाहीर करण्यासाठी सुधारीत शासकीय निकषाप्रमाणे तसेच केंद्र शासनाची संहिता, निर्देशांक, महामदत ॲप महाराष्ट्र रिमोट निर्देशांक कृषी व महसूल विभागाची सत्यमापन पाहणी इत्यादी निकषांची पूर्तता करुन दुष्काळाचा प्रभाव प्रत्यक्ष क्षेत्रिय पाहणीनुसार करण्याची मागणी शेतकरी व तज्ञांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील पिक परिस्थितीचा आढावा घेऊन शेत पिकांचे तातडीने पंचनामे करणे, दुष्काळात समाविष्ट न झालेल्या तालुक्यांचा समावेश करुन पाण्याचे टँकर, जनावरांसाठी चारा छावण्या, मजूरांसाठी मनरेगा अंतर्गत कामे, साठवण तलावातील गाळ काढून शेतकऱ्यांच्या शेतात मोफत देणे इत्यादी उपाययोजना तातडीने सुरु करण्याची मागणी विविध स्तरावरुन होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन दुष्काळात समावेश न झालेल्या तालुक्याचा समावेश करुन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यासंदर्भात व त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करणे तसेच पाण्याचे योग्य नियोजन करुन दुष्काळी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) दुष्काळ व्यवस्थापन संहितेमध्ये विहित केलेल्या निकषानुसार खरीप २०२३ च्या हंगामातील जून ते सप्टेंबर या कालावधीतील पर्जन्याची तूट, उपलब्ध असलेल्या भूजलाची कमतरता, दूरसंवेदन विषयक निकष, वनस्पती निर्देशांक, मृदू आर्द्रता, पेरणीखालील क्षेत्र व पीकांची स्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करून या घटकांनी प्रभावित झालेल्या ४२ तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष पिकांचे नुकसानीचे सर्वेक्षण (Ground Truthing) करण्यात आले. त्या आधारे राज्यस्तरीय दुष्काळ देखरेख समितीकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार, राज्यातील १५ जिल्ह्यातील ४० तालुक्यांमध्ये दिनांक ३१/१०/२०२३ च्या शासन निर्णयान्वये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे.
(४) होय.
(५) दिनांक ३१/१०/२०२३ च्या शासन निर्णयान्वये दुष्काळ जाहीर करण्यात आलेल्या ४० तालुक्यंव्यतिरिक्त राज्यातील इतर तालुक्यातील १०२१ महसुली मंडळामध्ये शासन निर्णय दिनांक १०/११/२०२३ अन्वये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करण्यात आली. सदर मंडळांमध्ये देखील खालीलप्रमाणे एकूण ८ सवलती लागू करण्यास शासनाची मंजूरी देण्यात आली आहे.
१) जमीन महसूलात सूट.
२) सहकारी कर्जाचे पुनर्गठन.
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती.
४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात ३३.५% सूट.
५) शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी.
६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता.
७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर.

८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

त्याचप्रमाणे संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना दुष्काळी तालुके व दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित केलेल्या महसुली मंडळामध्ये आवश्यक त्या सर्व उपाययोजना अंमलात आणण्यास प्राधिकृत करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे वरवेली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथे विनापरवाना नवीन दगडखाण सुरु केल्याबाबत**

**(७) * ७२०१८ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वरवेली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील दगडखाणीवर शासनाने कारवाई करुन ती बंद केली असतानाही तेथून २०० मीटरवर विनापरवाना नवीन खाण सुरु करुन उत्खनन सुरु केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खाणीमुळे व तेथे लावण्यात येणाऱ्या सुरुंगामुळे ग्रामस्थांना धुळीचा व प्रदूषणाचा त्रास होत असून त्यांच्या शेतीचे व घरांचे नुकसान होत असल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन विनापरवाना उत्खनन करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) मौजे वरवेली, ता.गुहागर येथील गट नं.१७०७, १७४९ व १७५२ मधुन संबंधिताना दिनांक २७.१०.२०२३ च्या आदेशान्वये १००० ब्रास या गौण खनिजाकरीता व दिनांक १०.११.२०२३ च्या आदेशान्वये ५००० ब्रास दगड या गौण खनिजाकरीता महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन) नियम, २०१३ च्या नियम ५९ तसेच नियम ४६ (१४) (ख) मधील तरतुद विचारात घेवून जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी तात्पुरता / अल्प मुदतीचा गौण खनिज उत्खनन परवाना दिलेला आहे.

(२) मौजे वरवेली ता.गुहागर येथील गट नं.१७०७, १७४९ व १७५२ मधुन उत्खननामुळे व तेथे लावण्यात येणाऱ्या सुरुंगामुळे ग्रामस्थांना धुळीचा व प्रदूषणाचा त्रास होत असून त्यांच्या शेतीचे व घरांचे नुकसान होत असल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधितांवर कारवाई करण्यात यावी याबाबतचे लोकप्रतिनिधी यांचे लेखी निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत हजारो मजुरांना मजूरी मिळाली नसल्याबाबत**

**(८) * ७६८३८ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील सुमारे ४८ ग्रामपंचायत क्षेत्रात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत हजारो मजुरांना माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२३ या महिन्यांची मजूरी अद्यापही मिळाली नसल्याचे दिनांक २ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तालुक्यातील सुमारे ५,३९२ मजूरांची दोन महिन्यांची एकूण ७४,६६,७९३ रुपयांची मजूरी अद्यापही न मिळाल्याने मजूरवर्ग आर्थिक अडचणीत आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरहू मजूरांची दोन महिन्यांची थकीत मजूरी तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२३ या कालावधीतील मजूरी दिनांक २/११/२०२३ रोजी प्रलंबित होती. तथापि आज रोजी मजूरी प्रलंबित नाही.
(२) हे खरे नाही.

माहे सप्टेंबर व ऑक्टोबर २०२३ या कालावधीतील मजूरांची मजूरी दिनांक १०/११/२०२३ रोजी मजूरांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. त्यामुळे मजूरांची मजूरी प्रलंबित नाही.
(३) केंद्र शासनाकडून काही तांत्रिक अडचणींमुळे निधी प्राप्त झाला नव्हता. त्यामुळे माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२३ या कालावधीतील मजूरांची मजूरी प्रलंबित होती. तथापि, माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२३ या कालावधीतील मजूरांची मजूरी दिनांक १०/११/२०२३ रोजी मजूरांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे.
(४) मजूरांची मजूरी अदा करण्यात आल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तोहोगाव (ता.गोंडपिपरी, जि.चंद्रपूर) शिवारात विमा कंपनीच्या प्रतिनिधींकडून शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याबाबत

**(९) * ७७१७० श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तोहोगाव (ता.गोंडपिपरी, जि.चंद्रपूर) शिवारात ओरिएंटल पिक विमा कंपनीच्या प्रतिनिधीने पंचनामा करताना अनेक शेतकऱ्यांकडून पैशाची मागणी केली असल्याचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी पैसे दिले अशा शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीची टक्केवारी जास्त तर ज्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी पैसे दिले नाहीत त्यांची टक्केवारी अल्प दाखविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होत असल्यामुळे संबंधित कंपनीच्या प्रतिनिधींवर गुन्हे दाखल करण्यासह पुन्हा पंचनामे करण्याची मागणी सर्वसामान्य शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन पिकांचे वस्तुस्थितीदर्शक पंचनामे करुन शेतकऱ्यांना योग्य ती नुकसान भरपाई देण्याबाबत व विमा कंपनीच्या प्रतिनिधीवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्ह्यातील मौजा. तोहोगाव, ता. गोंडपिंपरी शिवारात ओरीएंटल इन्शुरंन्स या पिक विमा कंपनीच्या प्रतिनिधींनी पंचनामा करतांना शेतकऱ्यांकडून पैशाची मागणी केली असल्याची लेखी तक्रार तालुका कृषि अधिकारी, कार्यालय गोंडपिंपरी किंवा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, चंद्रपूर या कार्यालयास लेखी स्वरुपात प्राप्त झालेली नाही. तथापि, मौजा तोहोगाव येथे पिक विमा नुकसान संबंधाने पंचनामा करण्यासाठी पैसे घेत असल्याबाबत दिनांक १८.१०.२०२३ रोजीच्या दै.पुण्यनगरी या वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती.

(३) हे खरे नाही.

(४) मौजा तोहोगाव येथे पिक विमा नुकसान संबंधाने पंचनामा करण्यासाठी पैसे घेत असल्याबाबत दिनांक १८.१०.२०२३ रोजीच्या दै.पुण्यनगरी मध्ये आलेल्या बातमीची शहानिशा व पडताळणी केली असता तथ्य आढळून आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील राष्ट्रीयकृत बँकाच्या जाचक अटीमुळे लाखो शेतकरी प्रोत्साहनपर अनुदानापासून वंचित असल्याबाबत

**(१०) * ७३०४३ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.मानसिंग नाईक (शिराळा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत नियमित कर्जाचा भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेऊनही त्याची प्रभावी अंमलबजावणी राज्यात झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक ठिकाणी राष्ट्रीयकृत बँकांचे जाचक निकष व अटी, आधार लिंक, शेतकऱ्यांना विशिष्ट क्रमांक प्राप्त न होणे व दुहेरी बँक खाते इत्यादी अनेक तांत्रिक त्रुटींमुळे लाखो शेतकरी अनुदानाच्या रकमेपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सर्व पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ विहित वेळेत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेच्या निकषानुसार एकुण १५.४४ लाख कर्जखाती पात्र ठरली. त्यापैकी १५.११ लाख शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केले असुन त्यापैकी १४.३० लाख शेतकऱ्यांना रु. ५१८८ कोटी इतक्या रकमेचा लाभ मंजुर केला असुन त्यापैकी १४.२८ लाख शेतकऱ्यांच्या कर्जखात्यावर रु.५१८० कोटी इतक्या रकमेचा लाभ प्रत्यक्ष हस्तांतरीत करण्यात आला आहे.

आधार प्रमाणीकरण केलेल्या परंतु, लाभ मंजूर / वितरण न केलेल्या कर्जखात्यांपैकी बँकांनी चुकीची माहिती भरलेली कर्जखाती तसेच एकापेक्षा अधिक कर्जखात्यांपैकी एक कर्जखात्यास लाभ दिल्याने उर्वरीत कर्जखात्यास लाभ अनुज्ञेय नसलेली कर्जखाती वगळता उर्वरीत ११.२२० कर्जखात्यांना रु. ४२.३० कोटी रकमेचा लाभ देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-वडोदरा महामार्गातील भूसंपादन प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(११) * ७२०८८ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावित (साक्री), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-वडोदरा महामार्गातील भूसंपादन प्रक्रियेत शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने बोगस कागदपत्रांच्या आधारे कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई-वडोदरा महामार्गांच्या अलाइनमेंटमध्ये भूसंपादन झालेल्या मु.नांदप मधील सर्व्हे नंबर ३१/४ मध्ये १४ व सर्व्हे नंबर २१/८/ब मध्ये १४ अशा एकूण २८ खोल्या दाखविण्यात आल्या असून तेथे केवळ १८ खोल्याच असताना खोट्या कागदपत्रांच्या आधारे २ कोटी २० लाख एवढा मोबदला काढून नांदप गावातील दोन व्यक्तींनी काही शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने शासनाची फसवणूक करून गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सामाजिक कार्यकर्ते श्री.मंगल शेलार यांनी या गैरव्यवहाराबाबत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे पुराव्यासह लेखी तक्रार करून एक वर्षापूर्वी २१/८/ब सर्व्हे नंबरमध्ये जे १४ खोल्यांचे बांधकाम दाखवून पैसे काढले तेच बांधकाम पुन्हा एका वर्षानंतर ३१/४ या सर्वे नंबरमध्ये दाखवून एकाच बांधकामासाठी दुप्पट पैसे घेऊन गैरव्यवहार केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी यांनी संबंधित दोन्ही व्यक्तींनी केलेल्या गैरव्यवहाराची रक्कम जमा करण्याचे आदेश पारित करुन योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू प्रकरणी उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशानुसार दोषींवर कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन दोषी व्यक्ती व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे नांदप, ता.कल्याण मधील सर्व्हे नं.२१/८ अ व २१/८ ब मधील १८ आर ३० चौ.मी. जमीन, तसेच सर्व्हे ३१/४ मधील ०५ आर जमीन मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्ग या प्रकल्पासाठी संपादित झाली असून, सदर जमिनीचा अंतिम भूसंपादन निवाडा दिनांक ३१.०३.२०१८ रोजी उपविभागीय अधिकारी, कल्याण यांनी घोषित केला. तसेच, भूसंपादन मोबदला संबंधितांना अदा केला आहे.

तथापि, उप अधिक्षक, भूमी अभिलेख, कल्याण यांनी दिनांक १०.०६.२०२१ अन्वये स.नं.२१/८ पै चा दुरूस्त संयुक्त मोजणी अहवाल सादर केलेला असून, भूसंपादित मिळकतीमध्ये ४ बांधकामे दर्शविली आहेत. त्यानुसार स.नं.२१/८ पै मधील भूसंपादित मिळकतीवरील बांधकामाच्या मोबदल्याबाबत दिनांक १८.०६.२०२१ रोजी रू.९७,४४,४९४/- रकमेचा पुरवणी निवाडा केला. तर, दिनांक २.०३.२०२३ अन्वये स.नं.३१/४ वरील बांधकामांचा दुसरा दुरूस्त संयुक्त मोजणी अहवाल सादर केला, त्याआधारे २ बांधकामे (१४ खोल्या) यांचा रू.१,११,७०,१५४/- रकमेचा पुरवणी निवाडा संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी घोषित केला आहे.

दरम्यान, तक्रारदार यांच्या दिनांक ८.०५.२०२३ रोजीच्या तक्रारीवरील सुनावणीत स.नं.२१/८/ब व स.नं.३१/४ या दोन्ही मिळकतीवर असलेल्या सामाईक बांधकामावर देखील मोबदला अदा केला असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले, त्यामुळे संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी दिनांक २८.०८.२०२३ च्या आदेशान्वये संबंधित भूधारकाने सामाईक बांधकामाचा स्विकारलेला मोबदला १० दिवसाचे आत परत करण्याचे आदेशित केले आहे.

सदर आदेशाविरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रि.या. क्र.१२७९८/२०२३ दाखल केली असून, त्यामध्ये दिनांक १८.१०.२०२३ रोजी मा.उच्च न्यायालयाने अंतरिम आदेश पारीत करुन उपविभागीय अधिकारी, कल्याण यांच्या दिनांक २८.०८.२०२३ च्या आदेशास स्थगिती दिली असून पुढील सुनावणी दिनांक १३.१२.२०२३ रोजी आहे.
(५) सामाजिक कार्यकर्ते यांनी दिनांक ३१.०८.२०२३ रोजी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे तक्रार केली आहे.
(६) सदर प्रकरणी बांधकामाच्या मुल्यांकन अहवालामध्ये आढळून आलेल्या विसंगती संदर्भात खुलासा सादर करण्याबाबत संबंधित उप अभियंता, उपविभाग क्र.१. कल्याण यांना जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कारणे दाखवा नोटीस दिली असून, सदर प्रकरणी अप्पर जिल्हाधिकारी, ठाणे यांना चौकशी करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेशीत केले आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) येथील प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत झालेला गैरव्यवहार

**(१२) * ७६६४२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज**

**देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) येथील कृषी अधिकारी श्री.वसंत राठोड व इतर अधिकाऱ्यांनी प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचन योजनेमध्ये ठिबक व तुषार साहित्य खरेदी प्रक्रियेत पुरवठादारासोबत आर्थिक संगनमत करुन ७७ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्त्यांनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आयुक्त, कृषी संचालनालय, पुणे यांचेकडून कोणतीही कारवाई न केल्याने बुलढाणा येथील सामाजिक कार्यकर्ते व शेतकरी यांनी माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मुंबई येथील आझाद मैदानावर उपोषण सुरु केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सिंदखेड राजा जिल्हा बुलढाणा येथील प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना सन २०२१-२२ मधील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी चौकशी करण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणी चौकशीमध्ये रु.७७,०२,७२३/- शासकीय रक्कमेचे अपहार केले प्रकरणी जय भवानी कृषी सेवा केंद्र सिंदखेड राजाचे वितरक श्री. सुरेश लक्ष्मण चव्हाण यांचे विरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये वितरकाचा परवाना रद्द करण्यात येऊन काळया यादीत नाव समाविष्ट करण्यात आलेले आहे. सूक्ष्म सिंचन संच तपासणी कामामध्ये जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करुन आर्थिक गैरव्यवहारास प्रोत्साहन दिल्याने तीन कृषी पर्यवेक्षकांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच एका लिपिकाची एक वेतनवाढ कायमस्वरूपी रोखण्यात आली आहे. या अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द विभागीय चौकशीची प्रस्तावित करण्यात आली आहे.

श्री. वसंत गणपत राठोड तालुका कृषी अधिकारी सिंदखेड राजा व श्री.जी.आर.बोरे मंडळ कृषी अधिकारी सिंदखेड राजा यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे व पुढील तपास पोलीसांमार्फत सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंडपिंपरी (जि.चंद्रपूर) येथे खतविक्रेत्यांनी शेतकऱ्यांची केलेली फसवणूक

**(१३) * ७३०७४ श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी विशेषत: गोंडपिंपरी (जि.चंद्रपूर) येथे खत विक्रेते युरियाची कृत्रिम टंचाई निर्माण करुन जादा दराने विक्री करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, युरिया खरेदीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना एका गोणीसोबत पूरक खते घेण्याची सक्ती विक्रेत्यांकडून केली जात असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन युरियाची कृत्रिम टंचाई तसेच काळाबाजार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पडघा (भिवंडी, जि.ठाणे) महसूल मंडळाच्या हद्दीतील जमिनीवर विनापरवाना गौण खनिजाचे उत्खनन होत असल्याबाबत

**(१४) * ७६४९७ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावित (साक्री) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पडघा (भिवंडी, जि.ठाणे) महसूल मंडळाच्या हद्दीत येणाऱ्या आतकोली, भादाणे पठारालगत शेकडो एकर जमिनीवर दगडखाणींचे अनधिकृतरित्या उत्खनन सर्रासपणे सुरू असून स्फोटामुळे पर्यावरण, शेती व ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा अवैध उत्खननांवर कायमस्वरूपी बंदी घालण्याबाबत दोन वर्षापासून विभागीय आयुक्त कोकण विभाग, जिल्हाधिकारी, ठाणे, तहसिलदार, मुरबाड, मा.महसूल मंत्री तसेच मा.पालक मंत्री, ठाणे जिल्हा यांच्याकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू दगडखाणी बंद करण्याचा आदेश असतानाही त्याच्या अंमलबजावणी संदर्भात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शेतीची नुकसान भरपाई मिळण्याबाबतच्या अनेक तक्रारी शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ तसेच महसूल अधिकाऱ्यांकडे केली असून ती मान्य न झाल्यास मंत्रालयाच्या समोर उपोषण व आंदोलनाचा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासह अवैध उत्खननास कायमस्वरूपी आळा घालण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४), (५) व (६) मौजे आतकोली (तळवली तर्फे सोनाळे) ता. भिवंडी येथील ग.नं. ३,५,९,१०,१३ व १४ गटामधुन (गुरचरण) सन २००८ ते २०११ या कालावधीकरीता एकूण ९ खाणपट्टे मंजुर करण्यात आले होते. सदर खाणपट्ट्याची मुदत सन २०१८ पूर्वी संपुष्टात आलेली असून सद्य:स्थितीत उत्खनन बंद आहे. तसेच सदर गुरचरण क्षेत्रा लगतच्या खाजगी जमिनीवर प्राप्त खाणपट्टे मंजूर करण्यात आले होते. त्यामधुन आज रोजी उत्खनन बंद आहे.

श्री. समशेर मोहम्मद माणेशिया यांनी "गुरचरण महाराष्ट्र शासनाच्या जमिनीवर विनापरवानगी दगड खाण करणारे व त्यांचे बरोबर संगणमत करणारे अधिकारी यांचेवर कायदेशीर कारवाई करणेबाबत" अशा आशयाची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाली आहे.

सदर तक्रार प्राप्त होण्यापूर्वी मौजे आतकोली (तळवली तर्फे सोनाळे) ता.भिवंडी येथील ग.नं.१०१, १०९, ११० या गुरचरण जागेतून उत्खनन होऊ नये म्हणुन येणारा जाणारा रस्ता चर खोदून तहसिलदार, भिवंडी यांनी बंद केला आहे. ग्रामपंचायत भादणे व ग्रुप ग्रामपंचायत तळवली-अर्जुनली यांचे ताब्यात असलेल्या गुरचरण जमिनीवर कोणत्याही प्रकारची शासनाची पूर्व परवानगी शिवाय होणाऱ्या वापराबाबत दिनांक १०.१०.२०१३ अन्वये संबंधितावर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मौजे आतकोली (तळवली तर्फे सोनाळे) येथे अनधिकृत गौण खनिज वाहतूक करणारे वाहन व गौण खनिज चोरी करण्याच्या उद्देशाने मिळवून आलेल्या वाहनावर पडघा पोलीस स्टेशन येथे अनुक्रमे गु.र.क्र.०५६१/२०२३ व ०४६६/२०२३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच मौजे पिसे (फुलोरे पाडा) येथील ग.नं.१११ मधुन अनधिकृत माती वाहतुक करत असल्याचे आढळून आल्याने संबंधिताविरूध्द पडघा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.०२६१/२०२२ गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार श्री.माणेशिया यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, भिवंडी येथील पथकामार्फत मौजे पडघा व आतकोली (तळवली तर्फे सोनाळे) परिसरामध्ये वाहनाची "महाखनिज" प्रणाली ॲपव्दारे वेळोवेळी तपासणी केली असुन एकूण ३६ अनधिकृत गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांकडून रू.५३,२४,३००/- दंड वसुल करण्यात आलेला आहे. तसेच पथकामार्फत मौजे आतकोली (तळवली तर्फे सोनाळे) ता.भिवंडी येथील ग.नं. ३,५,९,१०,१३ व १४ (गुरचरण) या मिळकतीमध्ये प्रत्यक्ष १७ वेळा प्रत्यक्ष पाहणी केली असता कोणत्याही प्रकारचे उत्खनन व वाहतूक सुरू असल्याचे आढळून आले नाही.

-----------------

**सडक-अर्जुनी (जि.गोंदिया) येथे वनपरिक्षेत्रातील सागवन वृक्षांची अवैध तोड होत असल्याबाबत**

**(१५) * ७१६५४ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सडक-अर्जुनी (जि.गोंदिया) येथे वनपरिक्षेत्रातील शेंडा वनकक्ष क्रमांक ६७६ (संरक्षित वन), १७२ (राखीव वन), ६८८, ७०३, ६८१ व ६७१ (संरक्षित वन) मध्ये वन अधिकाऱ्यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात सागवन झाडाची अवैध तोड करण्यात आल्याचे दिनांक २२ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी सागवन वृक्षाचे लाकूड जप्त न करता वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.जाधव यांनी नाममात्र फक्त १६ नग लाकूड जप्त करून आरोपीस अभय देण्याचा प्रयत्न केला असून या कामात इतर वन अधिकाऱ्यांचे देखील नाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सागवन वृक्षतोड रोखण्यासह यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) गोंदिया वनविभागातील सडक-अर्जुनी वनपरिक्षेत्रातील शेंडा सहवनक्षेत्रांतर्गत वनकक्ष क्रमांक ६७६ (संरक्षित वन), १७२ (राखीव वन), ६८८, ७०३, ६८१ व ६७१ (संरक्षित वन) मध्ये विभागीय वन अधिकारी (दक्षता) नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीकडून दिनांक २३.०७.२०२३ ते २९.०७.२०२३ या कालावधीत केलेल्या क्षेत्रिय निरिक्षणा दरम्यान एकूण ४५ सागवन झाडाची अवैध वृक्षतोड करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) चौकशी समितीकडून करण्यात आलेल्या क्षेत्रिय निरिक्षणात शेंडा वनक्षेत्रातील अवैध सागवन वृक्षतोड प्रकरणी थुटाजवळूण एकूण १६ नग लाकुड १.५५३ घ.मी. माल जप्त करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणाच्या चौकशीत संबधित क्षेत्रिय अधिकारी जबाबदार असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) सदर अवैध वृक्षतोड प्रकरणी श्री.सुरेश जाधव, (तत्कालीन) वनपरिक्षेत्र अधिकारी, सडक अर्जुनी व श्री.एफ.एस.पठाण, (तत्कालीन) क्षेत्र सहायक, शेंडा यांना तात्काळ प्रभावे निलंबित करण्यात आले आहे. तसेच सुरेश जाधव, (तत्कालीन) वनपरिक्षेत्र अधिकारी, श्री. एफ.एस.पठाण, (तत्कालीन) क्षेत्र सहायक व श्री. नरेश शालीकराम पातोडे, (तत्कालीन) वनरक्षक, शेंडा सडक अर्जुनी वनक्षेत्र यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत सामायिक चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनेक जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीबाबत**

**(१६) * ७१६७० श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.पी.एन.पाटील (सडोलीकर) (करवीर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.नामदेव ससाणे (उमरखेड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक जिल्ह्यात अतिवृष्टी, ढगफुटी सदृश्य पाऊस, गारपीट, पुरामुळे व वादळी वाऱ्यांमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे, पशुधनाचे, फळबागांचे व स्थावर मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच नागपूर जिल्ह्यात अतिवृष्टी व ढगफुटीमुळे झालेल्या पावसाने तसेच नदीपात्र व नाल्यांवरील बांधकाम, सिमेंटचे रस्ते व सुशोभीकरणाकरिता बांधलेल्या भिंतींमुळे पाण्याचा विसर्ग न झाल्याने पावसाचे पाणी नागरीवस्त्यांमध्ये शिरुन मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे काही ठिकाणी पंचनामे अपूर्ण असणे, पिकांची सदोष आणेवारी, तर काही ठिकाणी पंचनामे होऊनही शेतकऱ्यांना अद्यापही नुकसान भरपाईची रक्कम मिळाली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी शासनाकडून हजारो कोटी रुपयांची मदत जाहीर करुनही अद्याप अनेक ठिकाणी ही मदत शेतकऱ्यांना मिळाली नाही त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, गतवर्षीच्या अवकाळी पावसामुळे राज्यातील सुमारे २१ लाख शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानाची भरपाईची रक्कम १० दिवसात देण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी करुन यासंदर्भातील शासन आदेश निर्गमित करुनही शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सद्य:स्थतीतील डॉप्लर सारखी यंत्रणा कार्यरत असतानाही अतिवृष्टीबाबतची कोणतीही पूर्वकल्पना तसेच पर्जन्यमान यंत्राद्वारे पावसाची अचूक मोजणी अभावी शेतकऱ्यांचे अधिकच नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, अतिवृष्टीमुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या झालेल्या अतोनात नुकसानाबाबत सखोल चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील :** (१) होय, जून ते ऑक्टोबर, २०२३ या कालावधीतील अतिवृष्टी व पूर यामुळे शेतीपिकांचे व इतर मालमत्तेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) होय.
(३) राज्यातील जून ते ऑक्टोबर, २०२३ या कालावधीतील अतिवृष्टी व पूर यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण होवून निधी मागणीचे प्रस्ताव विभागीय आयुक्त यांच्याकडून शासनास प्राप्त झाले आहेत. त्यानुसार निधी वितरणास मान्यता देण्यात आली आहे.
(४) नाही.
(५) नाही.

नोव्हेंबर, २०२१ ते मे, २०२२ या कालावधीत गारपीट व अवेळी पाऊस यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरीता रु.१३०.८८ कोटी इतक्या निधी वितरण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच, जानेवारी ते मे, २०२३ या कालावधीतील अवेळी पाऊस व गारपीट यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरीता रु.५४९.०७ कोटी इतक्या निधी वितरण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(६) हे खरे नाही.

कृषी विभागामार्फत महावेध प्रकल्पांतर्गत महसूल मंडळ स्तरावर बसविण्यात आलेल्या स्वयंचलित हवामान केंद्राद्वारे पावसाची रिअल टाईम आकडेवारी प्राप्त होत असून त्याची अचूक नोंद होते.
(७) माहे जून ते ऑक्टोबर, २०२३ या कालावधीतील अतिवृष्टी व पूर यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरीता रु.१२०८.३८ कोटी इतक्या निधी वितरण्यास मान्यता देण्यात आली असून थेट हस्तांतरण प्रणाली (डी.बी.टी.) मार्फत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मदतीच्या निधीचे वितरण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

----------------

## राज्यात सोयाबीन पिकांवरील रोगांचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याबाबत

**(१७) * ७१९७८ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र सोयाबीन पिकांवर प्रामुख्याने पिवळा मोझॅक तसेच खोड कीड, खेडकूडा, मुळकूडा, चारकोल, खोडमाशी, पांढरी माशी, उंट अळी, चक्रीभूंगा, तंबाखूवरील पाने खाणारी अळी इत्यादी रोगांचा प्रादुर्भाव झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात सोयाबीनचे उत्पादन होत असून अगोदरच नैसर्गिक आपत्तीमुळे उत्पादनावर विपरित परिणाम होत असताना पिकावरील रोगांमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसानग्रस्त पिकांचे अपूर्ण व दोषपूर्ण पंचनामे तसेच काही ठिकाणी पंचनामे होऊनही अद्यापही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हंगामाच्या मध्यावधीत झालेल्या पिकांच्या नुकसानीचा समावेश तसेच उपरोक्तपैकी अनेक रोगांचा पीक विम्यामध्ये समावेश नसल्यामुळे शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची चौकशी करुन सोयाबीन उत्पादन शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा देणे, पिक विम्यामध्ये उक्त सर्व रोगांचा समावेश करणे तसेच पीक विम्याची नुकसान भरपाईची रक्कम मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

खरीप हंगाम २०२३ मध्ये राज्यात प्रत्यक्ष ५०.८६ लाख हे. क्षेत्रावर सोयाबीन पिक घेण्यात आले असून दिनांक १.१२.२०२३ च्या अहवालानुसार राज्यात सोयाबीन पिकावर ७.९५५ लाख हे. क्षेत्रावर पिवळया मोझॅक/ खोडकुज/मुळकुज याचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळून आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सोयाबीन पिकावरील रोगाच्या अनुषंगाने बाधित क्षेत्राबाबत नुकसान भरपाई देण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही मदत व पुनर्वसन विभागामार्फत सुरु आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंहगड (जि.पुणे) येथील पायथ्याशी वन विभागाच्या तपासणीत उपद्रव शुल्क आकारणीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१८) * ७१८५९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंहगड (जि.पुणे) येथील पायथ्याशी वन विभागाच्या तपासणीत उपद्रव शुल्क आकारणीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पैसे घेऊन कर्मचारी पावत्या देत नसल्याबाबत पर्यटकांनी अनेकदा वन विभागाकडे तक्रार केली असतानाही त्यासंदर्भात कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये दिनांक ०८/१०/२०२३ रोजी किल्ले सिंहगड येथे जाण्यासाठी १८ मोटारसायकल व ०१ चारचाकी वाहनातून पर्यटक आले होते. त्यांचेकडून उपद्रव शुल्काच्या रक्कमेची मागणी केली असता, त्यांनी मागून येणाऱ्या दुचाकी चालकांकडून उपद्रव शुल्काची पावती देणेबाबत विनंती केली व ते पुढे रवाना झाले. परंतु त्यादरम्यान उपद्रव शुल्क पावती मशीनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने उशिराने तिकीट मशीनच्या सहायाने पावती काढण्यात आली होती. सदरची घटना ही एकमात्र असून उपद्रव शुल्क आकारणीमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही.

(२) व (३) वरील घटनेच्या अनुषंगाने संबंधित वनपाल आरागिरणी यांचेमार्फत चौकशी करण्यात येवून सदर संबंधित ०२ सुरक्षा रक्षकांना सक्त ताकीद देण्यात येवून त्यांना १५ दिवस कामावरुन कमी करण्यात आले होते. तसेच सर्व उपद्रव शुल्क Online पध्दतीने स्विकारण्याबाबत संबंधितांना आदेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-वडोदरा मार्ग, बुलेट ट्रेन व समृध्दी मार्ग या प्रकल्पासाठीच्या भूसंपादनामध्ये झालेला गैरव्यवहार

**(१९) * ७७३१२ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-वडोदरा मार्ग, बुलेट ट्रेन व समृध्दी मार्ग या भूसंपादित प्रकल्पांसाठी भूसंपादित झालेल्या शेतकऱ्यांना जमिनीचे कागदपत्रे काढून देण्याच्या कामांकरिता जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून नेमण्यात आलेल्या तज्ञांकडून गैरप्रकार सुरु असल्याने त्यांची नियुक्ती तातडीने रद्द करुन भूसंपादन व महसूल विभागाची माहिती असणाऱ्या सक्षम वरिष्ठ अधिकाऱ्यांची विधितज्ञ म्हणून नियुक्ती करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडे दिनांक २ नोव्हेंबर २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबई-वडोदरा महामार्गासाठीच्या भुसंपादन प्रक्रियेत पालघरचे तत्कालीन प्रांत अधिकारी यांनी बोईसर-चिल्हार या रस्त्यावरील किराटसह सफाळे, मासवण येथील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन प्रक्रियेत दलालांमार्फत सुमारे २०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पांच्या भूसंपादनामध्ये बनावट कागदपत्रे, जमिनीचे उतारे तयार करुन मृत शेतकऱ्यांच्या नावे असलेल्या जमिनीमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या उपजिल्हाधिकारी व नायब तहसिलदार असलेल्या अधिकाऱ्यांना निलंबित केले असल्याने या समकक्ष अधिकाऱ्यांची मुंबई आर्थिक गुन्हे शाखा व अंमलबजावणी संचालनालयाकडून चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती भूमिका घेतली आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने या भूसंपादित प्रकल्पांकरिता गैरप्रकार करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अशा आशयाचे निवेदन जिल्हाधिकारी, पालघर यांना प्राप्त झाले आहे.
(२), (३) व (४) अशी बाब पालघर जिल्ह्यामध्ये निदर्शनास आलेली नाही. तथापि, ठाणे जिल्हयात मुंबई-वडोदरा राष्ट्रीय महामार्ग या प्रकल्पात संपादित केलेल्या मौजे नांदिठाणे व मौजे दुगाड, ता.भिवंडी येथील काही जमिनीचा भूसंपादनाचा मोबदला बोगस व्यक्तींनी बनावट आधारकार्ड, ओळखीचे पुरावे व बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय यंत्रणेची फसवणूक करुन शासकीय रक्कम बेकायदेशीरपणे हस्तगत केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे महसूल व वन विभाग, शासन आदेश दिनांक ३०.१२.२०२२ रोजीच्या आदेशान्वये श्री.मोहन नळदकर व श्री.बाळासाहेब वाकचौरे, तत्का. उप विभागीय अधिकारी, भिवंडी यांना निलंबित केलेले आहे.

महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक, दिनांक २३.०२.२०२३ अन्वये विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली.

तसेच, पालघर जिल्ह्यातील भूसंपादनाच्या विविध प्रकरणांमध्ये प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक १५.०७.२०२३ च्या आदेशान्वये अपर जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथे संत्रा गळती व शंख अळीचा प्रादुर्भाव झाल्याने नुकसानग्रस्त संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(२०) * ७६५४३ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भात संत्रा पिकाची मोठ्या प्रमाणात गळती झाल्याने व शंख अळीच्या प्रादुर्भावाने संत्रा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परिसरातील संत्रा फळाचे सातत्याने नुकसान होत असल्यामुळे याबाबत कोणती प्रभावी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.
(२) विदर्भातील संत्रा फळगळीवर उपाययोजना सुचविण्यासाठी कुलगुरु, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

सदर समितीच्या शिफारशीनुसार संत्रा फळगळ नियंत्रणाचे अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) संबंधित नाही.

-----------------

**मलकापूर (जि.बुलढाणा) येथील उन्नती महिला नागरी पतसंस्थेने ठेवीदारांची केलेली फसवणूक**

**(२१) * ७४४०४ श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर (जि.बुलढाणा) येथील उन्नती महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाने पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग व गैरवापर करुन संस्थेच्या जमा असलेल्या ठेवीदारांच्या ठेवी परत न करता जवळजवळ रु.७ कोटींची फसवणूक केल्याचा प्रकार दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात उन्नती महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संचालकांवर कारवाई करुन त्यांच्या मालमत्ता जप्त करुन ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) अंशत: खरे आहे

सदर पतसंस्थेच्या सन २०२१-२२ चे लेखापरिक्षण अहवालानुसार संस्थेमध्ये रु.६,३१,८२,१५२/- एवढ्या रकमेचा अपहार झाल्याचे नमुद करण्यात आले आहे.
(२) व (३) सन २०२१-२२ या कालावधीचे वैधानिक लेखापरिक्षण अहवालानुसार दोषी असलेल्या व्यक्तींवर पोलीस स्टेशन, मलकापूर येथे गुन्हा क्र.०३६८, दिनांक १३/०७/२०२३ अन्वये नोंदविला आहे. तसेच संस्थेचे ठेवीदार श्री. वैभव गणेशराव पाटील यांनी केलेल्या तक्रार अर्जावर मा. न्यायालयाचे आदेशानुसार पोलीस स्टेशन, मलकापुर येथे सर्व संचालक मंडळ व व्यवस्थापक यांचेविरुध्द गुन्हा क्र.०३६९ दिनांक १३/०७/२०२३ रोजी नोंद करण्यात आला आहे.

लेखापरीक्षण अहवालानुसार सदर पतसंस्थेची आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी करण्याकरिता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मलकापुर यांनी दिनांक ०२/०८/२०२३ रोजीच्या आदेशान्वये चौकशी अधिकारी म्हणून ॲड. राहूल बबनराव पवार यांची नियुक्ती केली आहे.

दिनांक १४/०७/२०२३ रोजी सदर पतसंस्था अवसायनात घेतली असून नोव्हेंबर अखेर एकूण ३० ठेवीदारांच्या रु. ३.९० लाख इतक्या रकमेच्या ठेवी परत करण्यात आल्या असुन उर्वरित ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत करण्याची कारवाई अवसायकामार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याच्या मत्स्य विभागात सहाय्यक मत्स्य आयुक्त आणि मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी पदांच्या उमेदवारांना दाखल्याअभावी मुलाखतीपासून वंचित ठेवल्याबाबत

**(२२) * ७३८३३ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मत्स्यविकास विभागात २० सहाय्यक मत्स्य आयुक्त आणि २७ मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी पदांच्या भरतीसाठी लोकसेवा आयोगाकडून दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास चाचणी परीक्षा घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परिक्षेत पास झालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी येताना अद्ययावत नॉन-क्रिमीलेअर दाखला सादर करण्याबाबत पत्रात कोणताही उल्लेख नसताना उमेदवार मुलाखत केंद्रावर पोहोचल्यानंतर नॉन-क्रिमीलेअर दाखल्याअभावी त्यांना मुलाखतीपासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अर्ज करताना नॉन-क्रिमीलेअर सादर केलेले असतानाही केवळ अद्ययावत दाखल्याअभावी उमेदवारांना जाणीवपूर्वक मुलाखतीपासून वंचित ठेवण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पात्र उमेदवारांना न्याय देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.
(२) नाही.
(३) कोणत्याही उमेदवाराला नॉन-क्रिमीलेअर दाखल्याअभावी मुलाखतीपासून वंचित ठेवण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकणातील आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना व्याजमाफी देण्याबाबत

**(२३) * ७२२१४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य व केंद्र शासनाने आंबा व काजू पिकविमा योजनेचा हप्ता न भरल्यामुळे १२० कोटी रुपयांच्या नुकसान भरपाईपासून कोकणातील शेतकरी वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच कोकणात सन २०१५ मध्ये अवकाळी पावसामुळे झालेल्या आंबा पिकाच्या नुकसानी संदर्भात तीन महिन्यांची व्याजमाफी आणि पुनर्गठित कर्जावरील व्याज अशी सुमारे साडे आठ कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ जमा करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी संबंधित विभागास आंबा व काजू प्रश्नासंदर्भात दिनांक ६ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आलेल्या बैठकीत दिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच यासंदर्भात कृषी मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कृती दल स्थापन करुन त्यामध्ये कोकण कृषी विद्यापीठ आणि कृषी तज्ञांचा समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार व्याज माफीसाठी कोणते निकष लावण्यात आले असून किती शेतकऱ्यांच्या खात्यात व्याजमाफीची किती रक्कम जमा करण्यात आली आहे,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोकणातील आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई व पीक विमाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) हे खरे नाही,

आंबिया बहार सन २०२२-२३ मधील राज्य हिस्सा शासन निर्णय दिनांक १७ मार्च, २०२३, दिनांक ३१ मार्च, २०२३, दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२३ व दिनांक २३ ऑक्टोबर, २०२३ अन्वये भारतीय कृषि विमा कंपनीस रक्कम रु.१५०.५८ कोटी, एचडीएफसी ॲग्रो जनरल इन्शुरन्स कंपनीस रक्कम रु.५९.४५ कोटी व रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीस रक्कम रु.९४.८५ कोटी अशी एकुण रक्कम रु.३०४.८९ कोटी विमा कंपनीस अदा करण्यात आली आहे. तसेच दिनांक ०३.११.२०२३ रोजी केंद्र हिस्सा विमा कंपन्यांना प्राप्त झालेला आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) हे खरे नाही,

तथापि, कृती दल स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव कृषि आयुक्तालयाकडून शासनास प्राप्त झाला असुन पुढील कार्यवाही कृषि विभागामार्फत सुरु आहे.

(४) कृती दल स्थापन करण्याबाबतची कार्यवाही कृषि विभागामार्फत सुरु असल्याने अद्याप असे कोणतेही निकष निश्चित केले नाहीत. तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यात व्याजमाफीची रक्कम महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक ०४/०२/२०१५, महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक १३/०४/२०१५ व सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कडील परिपत्रक दिनांक २५/०८/२०१५ अनुसार निकष पुर्तता करणाऱ्या रत्नागिरी जिल्ह्यातील पात्र ५५८ शेतकऱ्यांना वेळोवेळी रक्कम रू.५३,७१,५९५/- (तीन महिने व्याजमाफी) बँक खात्यात जमा करण्यात आली आहे.

रुपांतरीत कर्जावरील व्याजमाफी :- सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय, दिनांक २९ जुलै २०१५ अनुसार सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात नैसर्गिक आपत्तीने बाधित झालेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी घेतलेल्या अल्प मुदत कर्जाचे मध्यम मुदत कर्जात रूपांतर करून जे शेतकरी या रूपांतरीत कर्जाचा प्रत्येक वार्षिक हप्ता बँकेस विहीत मुदतीत परत करतील अशा शेतकऱ्यांच्या कर्जावरील सन २०१५-१६ या वर्षाचे बँक व्याज दराचे संपूर्ण व्याज व त्या पुढील चार वर्षाचे (सन २०१६-१७ ते २०१९-२०) ६ टक्के दराने होणारे व्याज शासनामार्फत शेतकऱ्यांच्या वतीने संबंधित बँकांना अदा करावयाची होती. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे पत्र, दिनांक ०९/११/२०२३ अन्वये एकूण १४६३ कर्जदार शेतकऱ्यांना व्याज भरपाई कमाल रक्कम रूपये ४९८,८५,६१५/- चा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील मासेमारी बंदीचा कालावधी वाढविण्याबाबत**

**(२४) * ७४१२३ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मुंबईतील वर्सोवा येथील समुद्रामध्ये दिनांक ५ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास मासेमारी नौका बुडून मच्छीमाराचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळयात मासेमारी बंदीचा कालावधी केवळ माहे १ जून ते ३१ जुलै दरम्यानचा असून त्यानंतरही समुद्रातील वातावरण मासेमारीकरिता सुरक्षित नसल्यामुळे अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पावसाळयात समुद्राला उधाण येत असल्याने मासेमारी बंदीचा कालावधी हा दिनांक १ जून ते १५ ऑगस्ट किंवा नारळी पोर्णिमेपर्यंत वाढविण्याची मागणी अखिल मच्छीमार कृती समितीने सचिव, मत्स्यव्यवसाय यांच्याकडे दिनांक ७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर मासेमारी बंदी कालावधी वाढविणे तसेच मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय.

अखिल मच्छीमार कृती समितीने दिनांक ७ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या ई-मेलव्दारे समुद्रात बुडून मृत्युमुखी झालेल्या वर्सोवाच्या मच्छीमारांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनास निवेदन दिले आहे.
(४) भारताच्या पूर्व किनारपट्टीवर मान्सूनचे आगमन लवकर होत असल्याने या किनारपट्टीवर मासेमारी बंदी कालावधी दिनांक १५ एप्रिल ते १४ जून (दोन्ही दिवस धरून) आहे. पश्चिम किनारपट्टीवर मान्सूनचे आगमन उशिरा होत असल्याने पश्चिम किनारपट्टीवर मासेमारी बंदी कालावधी दिनांक १ जून ते ३१ जुलै (दोन्ही दिवस धरून) आहे. तसेच प्रत्येक किनारपट्टीच्या राज्यामध्ये एकसुत्रता असण्याकरिता हा बंदी कालावधी निश्चित केलेला आहे.

मुंबई उपनगर जिल्ह्यातील वर्सोवा बंदरासमोरील समुद्रात दिनांक ५/०८/२०२३ रोजी सायं.४.३० च्या दरम्यान नौका मालक व त्यासोबत इतर दोघे मासेमारी करण्याकरिता नौका जय खोडियार (IND-MH-२-MM-५९५८) गेले असता नौका अपघातग्रस्त होऊन बुडाली आहे. सदर नौकेवरील नौका मालक हे पोहत किनाऱ्यावर पोहचले व त्यांचा जीव बचावला. तथापि इतर दोघे मृत्युमुखी पडले. सदर नौकेचे नौका नोंदणी प्रमाणपत्र सन २०२१ साली रद्द करण्यात आली आहे. तसेच मासेमारी सागरी नियमन अधिनियम १९८१ अंतर्गत मासेमारीसाठी आवश्यक असलेला मासेमारी परवाना काढलेला नव्हता. अपघातामध्ये मृत दोन्ही व्यक्ती ह्या कोणत्याही मच्छिमार संस्थेचे क्रियाशील मच्छिमार सभासद नव्हते. मृत व्यक्तींच्या कुटुंबियास मासेमार संकट निवारण निधीमधून आर्थिक मदत मिळण्यासाठीचा प्रस्ताव आजमितीपर्यंत वारसदारांकडून सादर करण्यात आलेला नाही.

सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां.) मुंबई उपनगर कार्यालयाकडून मृत मच्छिमारांच्या वारसदारांना मासेमार संकट निवारण निधीतून सहाय्यक अनुदान देणेबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबतची कार्यवाही सुरु आहे. संबंधित वारसदारांकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होताच मासेमार संकट निवारण निधीतून अर्थसहाय्य देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावित क्षेत्र (नैना) प्रकल्पामध्ये समाविष्ट गावांच्या नियमित कामकाजासाठी सदर प्रकल्प महसूल व भूमी अभिलेख विभागाकडे कायम ठेवण्याबाबत

**(२५) * ७२१७२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावित क्षेत्र (नैना) प्रकल्प हा सिडको अंतर्गत नियोजन प्राधिकरण असल्यामुळे त्यांना भूमी अभिलेख विभागाला त्या गावांचे नियमित कामकाज जसे मोजणी काम, भूसंपादन व बिगरशेती मोजणी इत्यादी कामाचे अधिकार नसल्यामुळे स्थानिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील जमिनधारकांना आपल्या भूमी अभिलेख कामांसाठी सिडको कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत असून सिडकोच्या कर्मचाऱ्यांवर या कामाचा अतिरिक्त ताण येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नैना प्रकल्पांतर्गत समाविष्ट गावांच्या नियमित कामकाजासाठी सदर प्रकल्प महसूल व भूमी अभिलेख कार्यालयाकडे कायम ठेवण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मा. महसूल मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन सादर केले आहे.
(४) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावित क्षेत्र (नैना) या अधिसुचित क्षेत्राचा विकास करताना जमिनीची मोजणी करणे, मालमत्ता पत्रके तयार करणे व इत्यादी कामांसाठी शासन निर्णय दिनांक १०.०४.२०२३ अन्वये नैना प्रकल्पासाठी भूमि अभिलेख संवर्गातील १७ पदे व महसूल संवर्गातील ५ अशी एकूण २२ पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत. उक्त शासन निर्णयानुसार त्या पदांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व महसूल आणि भूमी अभिलेख संवर्गातील कायदे/ नियम याद्वारे प्रदान केलेले अधिकार राहणार आहेत. नैना क्षेत्रातील गावांचे अभिलेख हस्तांतरणासाठी आदेश जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांनी दिनांक २८.०७.२०२३ रोजी दिलेले आहेत. त्यानुसार अभिलेख हस्तांतरणाची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विविध कारणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(२६) * ७१७११ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.योगेश सागर (चारकोप), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सततची नापिकी, कर्जबाजारीपणा, हवामानातील बदल, शेत मालाला भाव नसणे इत्यादी अनेक कारणास्तव मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या करीत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती ६३७, औरंगाबाद ५८४, नाशिक १७४, नागपूर १४४, पुणे १६, लातूर ९८, मराठवाडा ६८५, धुळे या व्यतिरिक्तही राज्यात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकरी आत्महत्याग्रस्त भागाकडे शासनाने विशेष लक्ष देवून आत्महत्यांसाठी कारणीभूत ठरणाऱ्या अनेक समस्यांचे निराकरण करुन या आत्महत्या रोखण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाचे चौकशी करून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांचे पुनर्वसन तसेच त्यांना आर्थिक मदतीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) जानेवारी, २०२३ ते ३१ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत अमरावती विभाग ९५१, छत्रपती संभाजीनगर विभाग (मराठवाडा) ८७७, नाशिक विभाग २५४, नागपूर विभाग २५७, पुणे विभाग २७, लातूर जिल्हा ६४, धुळे जिल्हा ४८ एवढी शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे आढळून आली आहेत.
(३) शेतकरी आत्महत्या रोखण्याच्या दृष्टीने कृषी व इतर विविध विभागांमार्फत खालील उपाययोजना राबविण्यात येत आहेत :-
१. कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन अंतर्गत शेतकऱ्यांना समुपदेशनाची व प्रबोधनाची आवश्यकता विचारात घेऊन विविध उपाययोजना राबविल्या जातात.
२. विशेष मदतीच्या कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांच्या विकासासाठी "कृषी समृध्दी" योजनेच्या अनुषंगाने विविध विभागांकडून उपाययोजना करण्यात येत आहेत.
३. शेतमालाला हमीभाव, PM-KISAN सारख्या योजनांमार्फत शेतकऱ्यांवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना राबविण्यात आली आहे.
४. शेतकऱ्यांना केवळ १.०० रूपया भरून पिक विमा योजनेचा लाभ देण्याकरिता "सर्वसमावेशक पिक विमा योजना" सन २०२३-२४ पासून राबविण्यास दिनांक २३ जून, २०२३ च्या कृषी विभागाच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे.
५. राज्य शासनाकडून प्रतिवर्ष रुपये ६०००/- शेतकऱ्यांना देण्यासाठी नमो शेतकरी महासन्मान निधी योजना कृषी मार्फत राबविण्यात येत आहे.
६. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास राज्य आपत्ती व्यवस्थापन निधीतून अथवा वेळ प्रसंगी राज्य शासनाच्या निधीतून निकषाबाहेर मदत दिली जाते.
(४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये सततची नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या कारणांमुळे शेतकरी आत्महत्या झालेली असल्यास मदत व पुनर्वसन विभागामार्फत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना रू.१.०० लक्ष आर्थिक मदत दिली जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भात बनावट खते व बियाणांचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(२७) * ७२०७४ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहुली जहांगीर (जि.अमरावती) येथे पोलीस ठाण्याच्या शिवारातील गोदामात बनावट खतांचा व्यवसाय अनधिकृतरित्या सुरु असल्याचे दिनांक २१ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गोदामावर कृषी व पोलिस विभागाने छापा टाकला असता २ कोटी ३९ लाख रूपयांचा अनधिकृत खतांचा साठा व विविध कंपन्यांचे लेबल असलेल्या रासायनिक खताच्या ४०० च्या वर रिकाम्या बॅग व पॅकींग मशिन आढळून आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच विदर्भात मोठ्या प्रमाणावर बनावट खत व बियाणांचा काळाबाजार एका कंपनीतर्फे सुरु असून मोर्शी (जि.अमरावती) येथील खताच्या गोदामातून बोगस खताचा पुरवठा होत असल्याचेही माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. सदरील बाब मोर्शी येथे आढळून आली नसून, ती बाब नवकिसान बायो प्लॅनेट, व्दारा आनंद काशीनाथ वाढोकर, स.नं. २०३, पोलीस स्टेशनच्या पाठीमागे, मोर्शी रोड, माहुली जहांगीर, ता. जि.अमरावती येथे आढळून आली आहे.
(४) माहुली जहांगीर प्रकरणी पोलीस स्टेशन माहुली जहांगीर, ता.जि.अमरावती येथे गुन्हा क्रमांक ०१७१/२०२३ हा दिनांक १९.०८.२०२३ अन्वये दाखल करण्यात आला आहे. त्यावर पुढील कार्यवाही पोलीस यंत्रणेमार्फत सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा, हिंगोली व नागपूर जिल्ह्यातील रेतीचा अवैध उपसा करून वाहतूक होत असल्याबाबत

**(२८) * ७१९०५ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील पवनी-ब्रम्हपूरी मार्गावरील खातखेडा येथील नदी घाटावरून रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालकाने कारवाई करण्यास गेलेल्या महसूल विभागातील पथकातील अधिकाऱ्यांच्या अंगावर ट्रॅक्टर चालविल्यामुळे महसूल अधिकारी जखमी झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच घाटांचे लिलाव न झाल्याने रेतीचा उपसा आणि विना रॉयल्टी वाहतुकीवर प्रतिबंध असतानाही नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यातील कन्हान नदीवरील तामसवाडी घाटातून रेतीचा रोज मोठ्या प्रमाणावर अवैध उपसा करण्यात येत असल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) तसेच, मौ. धारट व चिमेगांव (ता.औढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील शिवारात अवैध वाळू वाहतूक होत असल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वाळूने भरलेला ट्रॅक्टर पकडण्यासाठी तलाठी गेले असता ट्रॅक्टर मालकाने तलाठ्याला धक्काबुक्की केली व त्यांना त्याच ठिकाणी डांबून ठेवले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकारामुळे शासकीय नियमांचे उल्लंघन करून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविण्यात येत असून अधिकाऱ्यांवर होणाऱ्या हल्ल्याचे प्रमाणही वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) वैनगंगा नदीकाठावरील मौजा खातखेडा, ता.पवनी, जि. भंडारा येथील घाटातून गौण खनिज रेतीची अवैध उत्खनन व वाहतूक प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी गेलेल्या पथकातील तलाठी यांच्या अंगावर ट्रॅक्टर चालक यांनी ट्रॅक्टर घालून पळवून नेला. त्यामध्ये संबंधित तलाठी यांना गंभीर दुखापत झाली असुन, त्यानुषंगाने संबंधिता विरूध्द पवनी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.३२०/२०२३ दिनांक ११.०८.२०२३ रोजी भा.द.वि. कलम ३०७,३५३,३३३,३७९,५०६,१०९ व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ४८(७) व ४८(८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने मा. दिवाणी व फौजदारी न्यायालय, पवनी येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सद्य:स्थितीत सदर गुन्हा न्याप्रविष्ठ आहे.
(२) घाटांचे लिलाव न झाल्याने रेतीचा उपसा आणि विना रॉयल्टी वाहतुकीवर प्रतिबंध असतानाही नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यातील कन्हान नदीवरील तामसवाडी घाटातून रेतीचा रोज मोठ्या प्रमाणात अवैध उपसा करण्यात येत असल्याची बाब दिनांक ०१.११.२०२३ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आली ही बाब खरी नाही.
(३), (४) व (५) औढा नागनाथ तहसिल कार्यालयातील गौण खनिज पथकातील तलाठी हे अवैध वाहतुकीवर कार्यवाही करण्याकरीता गेले असता श्री. आरेफ छोटू शेख यांनी संबंधीत तलाठी यांच्याशी हुज्जत घालुन धक्काबुक्की करून पकडून ठेवले व वाळूने भरलेले ट्रॅक्टर पळवून नेण्यास मदत केलेल्या संबंधिता विरूध्द पोलीस स्टेशन औढा येथे गु.र.क्र. ०३१८/२०२३ दिनांक १८.०८.२०२३ रोजी, भा.द.वि. कलम ३५३,३३२,३७९,३४ व महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८(७) व ४८(८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

त्याचप्रमाणे मा.उपविभागीय अधिकारी, वसमत यांनी संबंधीतास महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ कलम ४८(७) व ४८(८) अन्वये दिनांक ०१.०९.२०२३ रोजी रू.१,३३,८५६/- एवढ्या रकमेची दंडात्मत नोटीस बजाविली आहे.

पथकामार्फत मौजे रूपूर ते सिध्देश्वर रस्त्याच्या काठावर अवैध उत्खनन करून ठेवण्यात आलेल्या ६० ब्रास रेतीसाठा जप्त करून तहसिल कार्यालयात ठेवण्यात आला असून त्यामधुन घरकुल लाभार्थी यांना सदर रेतीचे वाटप करण्यात येत आहे.

अवैध गौण खनिज वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यसाठी नेमण्यात आलेल्या पथकामार्फत दिनांक ०१.०४.२०२३ ते आजपर्यंत औंढा नागनाथ तालुक्यात एकून १५ वाहनावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. त्यापैकी तीन वाहनाकडून रू.४,००,४६८/- एवढी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. तर उर्वरीत १२ वाहने तहसिल कार्यालयात अटकावून ठेवण्यात आलेली आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाईसह विमा कंपनीकडून पिक विमा परतावा मिळण्याबाबत

**(२९) * ७२२१९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी)** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे, फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक ठिकाणी जीवित व वित्तहानी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन देखील पीक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईचे दावे निकाली न काढल्यामुळे शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बहुतांश जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या पिकांचे ७० ते ९० टक्के नुकसान झाले असतानाही तसेच शेतकऱ्यांना विमा कंपनीकडून एकूण संरक्षित रक्कमेच्या २५ टक्के रक्कम अग्रिम स्वरुपात देण्यासंदर्भातील अधिसूचना शासनाने निर्गमित करुनही याची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पावसाचे प्रमाण मंडळनिहाय निश्चित करण्यात येत असल्याने काही जिल्ह्यात कमी पाऊस पडलेला असतानाही मंडळात पाऊस झाल्याचे ग्राह्य धरुन मंडळे वगळल्याने व या मंडळनिहाय निकषामुळे अनेक ठिकाणी नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, हंगामा व्यतिरिक्त झालेले नुकसान, कागदपत्रांची पूर्तता न होणे, जाचक निकष, केवायसी व आधार लिंक, हवामान खाते व विमा कंपन्यांच्या अहवालातील भिन्नता इत्यादी अनेक तांत्रिक त्रुटींच्या आधारे विमा कंपन्यांकडून विम्याचे दावे नाकारण्यात येत असून पिक विमा कंपन्यांना नफा होत असून त्या विम्याची रक्कम शेतकऱ्यांना देत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी न्यायालयात याचिका दाखल केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मदतीअभावी शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून दुबार पेरणीचे संकट देखील समोर उभे असल्याने शेतकरी अधिकच हवालदिल झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, राज्य शासनाने विमा कंपन्यांना देय असलेल्या १५०० कोटी रुपयांपैकी केवळ ५०० कोटी रुपयांचे प्रदान केल्यामुळे विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांना अग्रिम रक्कम दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(८) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरघोस आर्थिक मदत, दुबार पेरणीसाठी व खताच्या खरेदीसाठी मदत देण्याबाबत तसेच तातडीने विम्याची रक्कम मिळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

खरीप हंगाम - २०२३ मध्ये माहे जानेवारी ते सप्टेंबर मधील अतिवृष्टी, पुर, अवकाळी पाऊस, वादळीवारे व गारपीट यामुळे ३४ जिल्ह्यात शेती/फळपिकांचे एकूण १६.५० लाख हे. क्षेत्र बाधित झालेले आहे. सदर बाधित क्षेत्राकरिता १६३०.१२ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असून नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही मदत व पुनर्वसन विभागामार्फत सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबीसाठी दिनांक ०५.१२.२०२३ अखेर राज्यात एकूण ३८.०६ लाख पूर्वसुचना प्राप्त झाल्या असून ३२.९१ पूर्वसुचनांचे सर्वेक्षण पूर्ण झालेले आहे. त्यापैकी १.८० लाख पूर्वसूचनांसाठी रक्कम रू.१३७.४५ कोटी निश्चित झाली असून एकूण १.६८ लाख शेतकऱ्यांना रु.१३०.२७ कोटी वाटप करण्यात आलेली आहे. उर्वरित पूर्वसुचनांसाठी निधी निश्चित करण्याची व वाटपाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत पिकांची पेरणी किंवा लावणी न झाल्यामुळे देय नुकसान भरपाई, स्थानिक नैसर्गिक आपत्ती, मध्य हंगामातील प्रतिकूल परिस्थिती अंतर्गत देय नुकसान भरपाई, काढणी पश्चात नुकसान भरपाई, हंगामाअंती उत्पन्नात येणाऱ्या घटीच्या आधारे देय नुकसान भरपाई या सर्व बाबीअंतर्गत पिक विमा योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार देय होणारी विमा नुकसान भारपाई अदा करण्याची कार्यवाही विमा कंपनीमार्फत करण्यात येते.

मध्य हंगामातील प्रतिकूल परिस्थितीमध्ये (Mid-Season Adversity) या बाबी अंतर्गत २४ जिल्हयामध्ये अधिसूचना निर्गमित झाली आहे. सदर बाबी अंतर्गत ४९.०५ लाख शेतकऱ्यांना अंतरिम नुकसान भरपाई रक्कम रु. २०८६.५४ कोटी निश्चित झाली असून त्यापैकी दिनांक ०५.१२.२०२३ अखेर २७.२८ लाख शेतकऱ्यांना रक्कम रु.१२८६.७३ कोटी वाटप करण्यात आली आहे. उर्वरीत नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही.

(६) हे खरे नाही.

(७) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२३ मध्ये राज्य शासनामार्फत विमा कंपन्यांना २३००.३४ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात तलाठी पदभरती परिक्षेत गैरप्रकार झाल्याबाबत

**(३०) * ७१८८९ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तलाठी पदासाठी घेण्यात आलेल्या परिक्षेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू परिक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यासाठी टीसीएस या कंपनीची नियुक्ती करण्यात आली असून कंपनीच्या डेटा सेंटर सर्व्हरमध्ये होणाऱ्या तांत्रिक बिघाडामुळे परिक्षा प्रक्रियेत सातत्याने खंड पडून अनेक विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू परिक्षेत पेपर फुटणे, अन्य व्यक्तीने परिक्षा देणे, केंद्रा बाहेरुन उत्तरे पुरविणे, केंद्रावरील कर्मचाऱ्यांचा यात सहभाग असणे, संबंधितांवर कारवाई न करण्याबाबत विविध स्तरावरुन दबाव असणे इत्यादी अनेक गैरप्रकार झाले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात निरनिराळ्या विभागाकडून मोठ्या प्रमाणात भरती प्रक्रिया राबविण्यात येत असताना यामध्ये होणाऱ्या गैरप्रकारांमुळे सहभागी इतर उमेदवारांचे मोठे नुकसान होत असून राज्यात यासाठी अनेक टोळ्या सक्रीय असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उत्तरप्रदेश, झारखंड, उत्तराखंड, बिहार, राजस्थान या राज्यात भरती प्रक्रियेसंदर्भात कडक कायदे अस्तित्वात असून त्याच धर्तीवर राज्यात देखील अधिक कडक कायदे करण्याची मागणी विविध स्तरावरुन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणांची सखोल चौकशी करुन योग्य ती कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे. तलाठी पदभरती परीक्षा, २०२३ दरम्यान घडलेल्या अनुचित प्रकारांच्या अनुषंगाने गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

(२) टीसीएस कंपनीची निवड करण्यात आली आहे हे खरे आहे. मात्र सदर कंपनीच्या डेटा सेंटर सर्व्हरमध्ये होणाऱ्या तांत्रिक बिघाडामुळे परीक्षा प्रक्रियेत सातत्याने खंड पडून अनेक विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे, हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे. तलाठी पदभरती परीक्षा, २०२३ दरम्यान घडलेल्या अनुचित प्रकारांच्या अनुषंगाने गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

(४) हे खरे नाही.

(५), (६) व (७) अशा प्रकारची मागणी आली आहे हे खरे आहे. स्पर्धा परीक्षांसंदर्भात पेपरफुटी व इतर गैरप्रकार योजनांसंदर्भात शासनास शिफारस करण्यासाठी तज्ञ समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाच्या विचाराधीन आहे. सदर तज्ञ समिती स्थापन झाल्यानंतर याबाबतचा कायदा करण्याबाबतचा प्रस्ताव सदर समितीकडे विचारार्थ सादर करण्यात येईल.

-----------------

**अमरावती (जि. अमरावती) शहरातील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील आजारी विद्यार्थीनीचा उपचाराविना मृत्यू झाल्याबाबत**

**(३१) * ७२२०० श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती (जि. अमरावती) शहरातील कोंडेश्वर मंदिर मार्गावर शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील इयत्ता दहावीत शिकत असलेली कु.श्रावणी सैबुलाल भुसूम (वय १४, रा.नवलगाव, सेमाडोह) ही विद्यार्थीनी सिकलसेलने आजारी असतानाही शाळा व्यवस्थापनाने तिच्यावर उपचार न करता गावी जाण्यास सुट्टी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थीनी गावाला जात असताना वाटेतच तिचा मृत्यू झाला असल्याची माहिती दिनांक ७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विद्यार्थीनीला गावी सुट्टीवर घेवून जात असल्याचे तिच्या बहिण व भावाकडून शाळा व्यवस्थापकांनी जबरदस्तीने लिहून घेतले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावित :** (१) व (२) हे खरे नाही.

कु. श्रावणी सैबुलाल भुसूम ही विद्यार्थीनी सिकलसेल आजाराने ग्रस्त असून शाळा प्रशासनामार्फत जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे नियमित तपासणी करुन दिनांक ०३.१०.२०२३ रोजी उपचारासाठी भरती करण्यात आले. परंतु त्याच दिवशी कु.श्रावणीची चुलत बहीण हिने तिच्यावर खाजगी उपचार करायचे असल्याचे सांगून तिला शाळेतून घेऊन गेली.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.